श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पं.स. संगमनेर यांची ऐच्छिक सेवा निवृत्ती मंजूर करण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१/५५७/२०२६
दिनांक:-स्वाक्षरीखाली नमूदप्रमाणे

वाचा:- १. गटविकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र क्र. ग्राप/आस्था-२/१५३६/२०२६ दि.२८/०७/२०२६
२. मा.मु.का.अ यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६
३. म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.६५

श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांनी संदर्भ क्र.१ मधील दि २३/०७/२०२६ रोजीच्या अर्जान्वये ऐच्छिक सेवानिवृत्ती मंजूर करणेबाबत विनंती केली आहे आणि संबंधित कार्यालय प्रमुखांनी श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचेकडून कोणतेही शासकीय/जिल्हा परिषद येणे बाकी नाही व त्यांचे विरुध्द कोणतीही चौकशी चालु नाही अथवा प्रस्तावित नाही असे दाखले सादर केलेले आहेत. त्यास अधिन राहुन, नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकरण आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.२ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६५ अन्वये श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, यांची दिनांक ३१/१०/२०२६ रोजी मध्यानोत्तर ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूर करीत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 20261001060185 असा आहे.

Digitally signed by
RAHUL ASHOK SHELKE
Date: 01-10-2026
11:01:11

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति - श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर
द्वारा- गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

प्रत - गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांना कार्यवाहीसाठी रवाना.

२/- श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांना दि ३१/१०/२०२६ रोजी मध्यानोत्तर कार्यमुक्त करावे, आणि पेन्शन प्रकरणाबाबत आवश्यक ते सर्व दाखले समाविष्ट करुन सत्वर सादर करणेची दक्षता घ्यावी. श्री. क्षीरसागर बाळू बगाजी, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांचे सेवानिवृत्ती नंतर भविष्यात शासकीय/जिल्हा परिषदेकडील/ ग्रामपंचायतीकडील वसुली पात्र रक्कम निघाल्यास ती त्यांचे सेवानिवृत्तीपासुन मिळणा-या रक्कमेतून वसूल करण्यात यावी.

प्रत - मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रत - ग्रापं- ८ पेन्शन, ग्रामपंचायत विभाग ,जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद अहिल्यानगर